## महाराष्ट्र शासन

## नगर रचना आणि मुल्यनिर्धारण विभाग
## उपसंचालक, नगर रचना, अमरावती विभाग, अमरावती यांचे कार्यालय
## अमरावती

### जाहिरात क्रमांक आस्था/ससेभ/रिक्तपदे/उपसंअम/२६११ दिनांक २६/१२/२०११

नगर रचना आणि मुल्यनिर्धारण विभागांतर्गत अमरावती विभागातील खालील संवर्गातील पदे सरळ सेवाभरतीने सामाजिक आरक्षण अंतर्गत समांतर आरक्षणाने भरावयाची आहेत. त्यासाठी पात्र उमेदवारांकडून सोबतच्या नमुन्यातील अर्ज खालील नमूद केलेल्या ठिकाणी व्यक्तीशः किंवा टपालाने दिनांक २१/०१/२०१२ रोजी सायंकाळी ५.४५ वाजेपर्यन्त किंवा तत्पुर्वी पोहचतील अशा बेताने पाठविण्यात यावेत. उमेदवार ऐकापेक्षा जास्त पदासाठी पात्र होत असेल तर त्यांनी त्यासाठी स्वतंत्रपणे अर्ज पाठवावेत. दिनाक २१/०१/२०१२ नंतर टपालाने वा कोणत्याही मार्गे प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत,याची कृपया नोंद घ्यावी.

### रिक्त पदांचा तपशील

| अ. क्र. | पदाचे नांव व रिक्त पदे | वेतन बॅन्ड | सामाजीक आरक्षण | समांतर आरक्षण | | | | | | | सर्व साधारण पदे | एकूण भराव-याची पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | --- | माजी सैनिक | महिला | खेळाडू | अपंग | अंशकालीन | प्रकल्पग्रस्त | भूकंपग्रस्त | | |
| १ | कनिष्ट लिपीक ०२ | पीबी-१ रु. ५२००-२०२०० , ग्रेड पे रु.१९००/- | विमाप्र | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | ०१ |
| | | | इमाव | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | ०१ |
| | | | **एकूण** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **०२** | **०२** |
| ०२ | अनुरेखक ०२ | पीबी-१ रु. ५२००-२०२००, ग्रेड पे रु.२०००/- व ७ वर्षाच्या अर्हताकारी सेवेनंतर ग्रेड वेतन रु.२४०० | विमाप्र | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | ०१ |
| | | | खुला | -- | -- | -- | -- | --- | -- | -- | ०१ | ०१ |
| | | | **एकूण** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **०२** | **०२** |
| ३ | शिपाई ०२ | १ एस रु.४४४०-७४४० ग्रेड पे रु.१३००/- | अ.जा. | -- | -- | -- | ०१ | -- | -- | -- | -- | ०१ |
| | | | खुला | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | ०१ |
| | | | **एकूण** | **--** | **--** | **--** | **०१** | **--** | **--** | **--** | **--** | **०२(*)** |

**(*)** टिप :- (i)शिपाई पदाकरीता भरावयाची दोन पदे भरतांना सामाजिक आरक्षणाचा विचार न करता प्राध्यान्य क्रमाने अपंग उमेदवाराची समातंर आरक्षणा अतंर्गत भरती करण्यात येईल.(ii)विमाप्रः-विशेष मागास प्रवर्ग, इमावः- इतर मागास प्रवर्ग, अ.जा.:-अनुसुचित जाती.

| अ.क्र. | पदनाम व गट | किमान शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | कनिष्ट लिपीक (गट-क) | १) माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षाउत्तीर्ण (S.S.C. Examination) (२) मराठी ३० शब्द प्र.मि. व इंग्रजी ४० शब्द प्र.मि. टंकलेखनाची परिक्षा उत्तीर्ण ३) संगणक अर्हता संबंधी खालील परिक्षा उत्तीर्ण MSCIT or GECT Certificate of Maharashtra State Higher & Technical Education Board मुंबई कडून उत्तीर्ण असावा किवां नियुक्तीनंतर दोन वर्षात सदर परिक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य आहे. |
| २ | अनुरेखक (गट-क) | १) माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षाउत्तीर्ण (S.S.C. Examination) २) (अ) इंटरमीजीएट ग्रेड ड्राईग परिक्षा उत्तीर्ण किंवा (ब) आय.टी.आय. स्थापत्य आरेखक परिक्षा उत्तीर्ण. ३) संगणक अर्हता संबंधी खालील परिक्षा उत्तीर्ण MSCIT or GECT Certificate of Maharashtra State Higher & Technical Education Board मुंबई कडून उत्तीर्ण असावा किवां नियुक्तीनंतर दोन वर्षात सदर परिक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य आहे. |
| ३ | शिपाई (गट-ड ) | वर्ग-४ था उत्तीर्ण गुणपत्रिका जोडणे आवश्यक आहे. (१० वी पास नंतरची शैक्षणिक अर्हता विचारात घेतली जाणार नाही. |

**वयोमर्यादा** :- दि. ३१.१२.२०११रोजी उमेदवाराचे वय १८ पेक्षा कमी व ३३ पेक्षा जास्त नसावे. शासन तरतुदीनुसार खालील प्रवर्गातील उमेदवारांना उच्च वयोमर्यादा अनुज्ञेय राहील.

१. महा. शासनाने मान्यता दिलेल्या मागासवर्गीय उमेदवार ३८ वर्षापर्यत
२. अपंग /प्रकल्पग्रस्त/माजी सैनिक /भुकंपग्रस्त ४५ वर्षापर्यत
३. पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन उमेदवार ४६ वर्षापर्यत
४. खेळाडु उमेदवार / स्वातंत्र्य संग्राम सैनिकाचे पाल्य ५ वर्षापर्यत वयाची अट शिथिल (खुला प्रवर्ग ३३+५ आणि मागासवर्गीयांसाठी ३८+५)

**सर्वसाधारण अटी :-**

१. उमेदवार हा महाराष्ट्राचा रहिवासी असावा.
२. या पदासाठी ए-४ आकाराच्या चांगल्या दर्जाच्या पांढ-या कागदावर टंकलिखित / छापलेल्या सोबतच्या विहित नमुन्यात अर्ज करावा.
अर्ज सादर करतांना सामाजिक तसेच समांतर आरक्षणांतर्गत ज्या प्रवर्गातील पदासाठी अर्ज करावयाचा आहे. ते स्पष्टपणे अर्जाच्या
सुरुवातीस नमुद करावे.
३. अर्जदाराने अर्जासोबत परीक्षा शुल्क (फी), न्यायालयीन फी मुद्रांक (कोर्ट फी स्टॅम्प) चे स्वरुपात जोडावयाचे असुन या व्यतिरिक्त अन्य स्वरुपात शुल्क स्वीकारले जाणार नाही, याची जातीने नोंद घ्यावी. विहीत शुल्क नसलेले अर्ज रद्द होतील .

| अ.क्र. | पदाचे नाव | खुला | राखीव | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | माजी सैनिकांना आवेदन शुल्क भरण्याची अट लागु नाही. |
| १ | कनिष्ट लिपीक-नि-टंकलेखक | १५०/- | ७५/- | |
| २ | अनुरेखक | २००/- | १००/- | |
| ३ | शिपाई | ५०/- | २५/- | |

४. अर्जासोबत स्वतःचे नाव व पत्ता असलेला रुपये ५/- चा पोस्टेज स्टॅम्प चिकटवुन २३x१२ से.मी. आकाराचा लिफाफा जोडावा. अर्जावर व ओळख पत्रावर (पहा परिशिष्ट - दोन) स्वतःचा पासपोर्ट साईज आकाराचा फोटो नमुद केलेल्या ठिकाणी चिकटवुन स्वतः स्वाक्षरी करावी. अर्ज पाठवितांना लिफाप्यावर कनिष्ट लिपिक नि-टंकलेखक/अनुरेखक/शिपाई यापैकी ज्या पदासाठी अर्ज करण्यात येत आहे त्या पदाचे नांव सामाजिक व समांतर आरक्षणासह स्पष्टपणे लिहावे. (उदा. कनिष्ट लिपिक नि-टंकलेखक/अनुरेखक/शिपाई पदासाठी अ.जा./खुला/इमाव/विमाप्र/अपंग प्रवर्ग असे स्पष्टपणे नमूद करावे.)

५. अर्जासोबत आवश्यक प्रमाणपत्राची साक्षांकित झेरॉक्स प्रती जोडाव्या. अशा प्रमाणपत्राच्या प्रती जोडलेल्या नसल्यास अर्ज रद्द समजण्यात येईल.

**(अ)** (i)शैक्षणिक तसेच इतर अर्हते बाबत आवश्यक त्या सर्व कागदपत्रांच्या साक्षांकित झेरॉक्स प्रती, (ii) महाराष्ट्र राज्यात वास्तव्य असल्याबाबतचे अधिवास प्रमाणपत्र,(iii)जन्मतारखेसाठी जन्मतारखेचा दाखला किंवा माध्यमिक शालांत परिक्षेचे प्रमाणपत्र (iv) जातीचे प्रमाणपत्र (v) अनुभव प्रमाणपत्र (vi) विमाप्र व इमाव प्रवर्गातील उमेदवारांनी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे सध्या वैध असलेले सक्षम प्राधिका-यांच्या प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत अर्जासोबत जोडावी. (vii)अपंगत्वाचे प्रमाणपत्र.

**(ब)** उमेदवार ज्या राखीव जाती प्रवर्गाच्या पदासाठी अर्ज करीत असेल त्या जातीचे प्रमाणपत्र व जात वैद्यता प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे. जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास उमेदवारांची अंतिम निवड झाल्यानंतर जात पडताळणी समितीचे वैधता प्रमाणपत्र सादर केल्या शिवाय नियुक्ती दिली जाणार नाही. (शासन परिपत्रक दिनांक ५.११.२००९ व दिनांक २६मार्च २०१०) तसेच नियुक्ती ही चारित्र पडताळणी तपासणी व वैद्यकिय तपासणी अहवालाच्या अधीन राहिल.

६. उमेदवाराने अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे मुलाखतीला बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही.

७. प्राप्त अर्जाच्या छाननी नंतर पात्र/अपात्र असलेल्या उमेदवारांची नांवे या कार्यालयाच्या नोटिस बोर्डावर लावण्यात येईल व त्यासाठी स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही.

८.अर्जाच्या छाननी नंतर पात्र उमेदवारांना लेखी परिक्षेकरिता ओळखपत्र टपालाने पाठविण्यात येईल व लेखी परिक्षेस उपस्थित राहतांना हे ओळख पत्र जवळ बाळगणे अनिवार्य राहील. ज्या उमेदवारांना ओळखपत्र टपालाव्दारे प्राप्त होणार नाहीत, त्यांना ड्रायव्हींग लायसन्स/निवडणुक कार्ड/आधार कार्ड/पासपोर्ट व तत्सम शासनमान्य ओळखपत्र इत्यादि प्रकारच्या ओळख पत्राच्या आधारे खात्री करुन उपसंचालक,नगर रचना,अमरावती विभाग अमरावती यांचे कडून परिक्षेचे दुय्यम ओळखपत्र परीक्षेपुर्वी एक दिवस अगोदर देण्यात येईल. ओळखपत्रा शिवाय लेखी व तोंडी परिक्षेकरिता परीक्षास्थळी प्रवेश देण्यात येणार नाही. टपालखात्यांच्या विलंबामुळे ओळखपत्र मिळण्यास उशीर झाल्यास त्याची जबाबदारी या कार्यालयाची राहणार नाही.

९. शासन निर्णय दिनांक १९.१०.२००७ नुसार कनिष्ट लिपिक करीता लेखी व अनुरेखक पदाकरीता लेखी व मौखिक तसेच शिपाई पदाकरीता फक्त मौखिक परीक्षा घेण्यात येईल. सदर परिक्षा त्या पदाच्या शैक्षणिक अर्हता आधारित ज्ञानावर राहील.

१०. अंतिम निवड ही लेखी परिक्षेतील गुण व मौखिक मुलाखतीत प्राप्त गुणांची एकत्रित बेरीज करुन (लागु असलेले) गुणवत्ता क्रमानुसार केली जाईल.

११. उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

१२. उमेदवाराला लेखी परिक्षा/मौखिक मुलाखती करिता स्वखर्चाने यावे लागेल.

१३. निवड समिती अध्यक्ष, सदस्य किंवा अधिकारी यांच्याकडे राजकीय दबाव आणल्यास संबंधित उमेदवाराला अपात्र ठरविण्यात येईल.

१४. महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ अन्वये विवाहित उमेदवारांनी त्यांच्या अर्जासोबत दिनांक २८.३.२००५ रोजी हयात असलेली व त्यानंतर जन्माला आलेली अपत्यांची संख्याबाबत विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सादर करावे. (अविवाहित उमेदवारांनीसुध्दा लागु नाही असे नमुद करुन सदर प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे.)

१५. या जाहिरातीमध्ये कोणतेही फेरबदल करण्याचे अधिकार निवड समितीकडे राहील. कोणत्याही कारणास्तव रिक्त पदांच्या संख्येत बदल अथवा भरती रद्द झाल्यास, याबाबत अर्जदाराला कोणताही दावा सांगता येणार नाही. परिक्षेचा प्रकार,पदांची संख्या, समांतर आरक्षण याबाबत बदल करणे, परीक्षा स्थगित करणे व रद्द करणे, अंशत: बदल करणे किंवा कोणत्याही संवर्गातील कोणत्याही पदाची भरती प्रलंबित ठेवणे याबाबतचे सर्व अधिकार निवड समितीने राखुन ठेवलेले आहेत. याबाबत कोणलाही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही.

१६. महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसुचित जमाती,विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण अधिनियम- २००४(सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक VIII मधिल नियम क्र.४ (२) (दोन) नुसार खालील प्रवर्गाच्या उमेदवारास तो उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नॉन क्रिमीलेअर) प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. उक्त प्रमाणपत्र दिनांक ३१.३.२०१२ पर्यत वैध असल्याचे सादर करणे आवश्यक आहे. असे प्रमाणपत्र प्राप्त झाले नसल्यास सक्षम प्राधिकरणाकडे अर्ज सादर केल्याची पावती जोडणे आवश्यक आहे. तथापी लेखी परिक्षेपुर्वी किंवा मुलाखतीचे वेळी सक्षम प्राधिकरणाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

१७. शासकीय/निमशासकीय कर्मचा-यांनी त्यांच्या कार्यालय प्रमुखाच्या परवानगीने अर्ज भरावा व अशा परवानगीची प्रत अर्जासोबत जोडावी. परवानगीशिवाय सादर केलेल्या अर्जाचे आधारे निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश दिल्या जाणार नाही व तसे आढळल्यास त्यांच्यावर शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल.

१८. पदांची उपलब्ध संख्या व समांतर आरक्षण विचारात घेता लेखी परिक्षेत समान गुण धारण करणा-या उमेदवारांच्या निवडीबाबत शासन निर्णयात दिलेल्या सुचनांच्या अधीन राहुन निवड केल्या जाईल. सर्व पदासंदर्भात एखादा उमेदवार लेखी परीक्षेत अधिक गुण घेऊन देखील मौखिक परिक्षेसाठी (मुलाखातीस) गैरहजर राहिल्यास त्यांची नियुक्तीसाठी शिफारस करण्यात येणार नाही.

१९. कनिष्ट लिपिक नि-टंकलेखक/अनुरेखक/शिपाई या पदाकरिता खालील प्रमाणे परिक्षा घेण्यात येईल.

**(अ)**कनिष्ट लिपिक नि-टंकलेखक या संवर्गात पात्र उमेदवारांची दोन तासाच्या कालावधीची लेखाी परिक्षा घेण्यात येईल प्रश्न पत्रिका वस्तुनिष्ट बहुपर्यायी राहील.या परिक्षेचा दर्जा महाराष्ट्र राज्यातील माध्यामिक शालांत परिक्षेच्या (इयत्ता दहावी) दर्जा समान असेल. लेखी परिक्षेला मराठी,इंग्रजी,सामान्य ज्ञान,व अंकगणित या विषयावरील प्रश्नपत्रिका प्रत्येक विषयासाठी ५० गुण देवुन एकूण २०० गुणाची लेखी परिक्षा घेण्यात येईल. लेखी परिक्षेत उत्तीर्ण होण्यासाठी किमान ५०% म्हणजेच १०० गुण मिळविणे अनिवार्य आहे . लेखी परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना प्राप्त गुणानुक्रमानुसार गुणवत्ता यादीत समावेश करण्यात येईल. सदरच्या पदासाठी मुलाखत घेणे अपेक्षित नसल्याने गुणवत्ता यादीतील अनुक्रमा नुसार उपलब्ध पदाच्या संख्येच्या तुलनेत उमेदवारांची निवड सुची तयार करुन यथायोग्य शिफारसीसह नियुक्ती प्राधिका-यांकडे सोपविण्यात येईल.

**(ब)** अनुरेखक पदाकरिता पात्र उमेदवारांची दोन तासाच्या कालावधीची लेखाी परिक्षा घेण्यात येईल प्रश्न पत्रिका वस्तुनिष्ट बहुपर्यायी राहील. या परिक्षेचा दर्जा महाराष्ट्र राज्यातील माध्यामिक शालांत परिक्षेच्या (इयत्ता दहावी) दर्जा समान असेल. लेखी परिक्षेला मराठी,इंग्रजी,सामान्य ज्ञान व अंकगणित या विषयावरील प्रश्नपत्रिका प्रत्येक विषयासाठी २५ गुण देवुन एकूण १०० गुणाची लेखी परिक्षा घेण्यात येईल. लेखी परिक्षेत उत्तीर्ण होण्यासाठी किमान ५०% म्हणजेच ५० गुण मिळविणे अनिवार्य आहे. त्या नंतर व्यावसाईक चाचणी परिक्षेसाठी पात्र समजण्यात येईल.व्यावसायीक चाचणीत ट्रेसिंग व इंकिगसाठी अर्धा तासाच्या कालावधीत ४० गुण व कलरिंगसाठी अर्धा तासाच्या कालावधीसाठी ४० गुण असे एकुण ८० गुण निर्धारित करण्यात आले आहेत. व्यावसायीक चाचणीत उत्तीर्ण होण्यासाठी किमान ५०% गुण मिळविणे अनिवार्य आहे. लेखी परिक्षेत तसेच व्यवसायीक चाचणीत प्राप्त गुणाच्याआधारे संयुक्त गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल. संयुक्त गुणवत्ता यादीतील उमेदवारांना उपलब्ध पदाच्या संख्येच्या तुलनेत विहीत केलेल्या मर्यादेत गुणानुक्रमानुसार मुलाखतीसाठी पात्र समजण्यात येईल. मुलाखतीसाठी २० गुण राखुन ठेवण्यात आलेले आहेत. प्रत्यक्ष मुलाखतीसाठी गैरहजर राहीलेल्या उमेदवारांची नियुक्तीची शिफारस करता येणार नाही. लेखी परिक्षा,व्यावसायीक चाचणी व मुलाखत यामध्ये प्राप्त होणा-या गुणाच्या आधारे अंतिम संयुक्त गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल. गुणवत्ता यादीतील गुणानुक्रमा नुसार उपलब्ध पदाच्या तुलनेत उमेदवाराची निवडसुची तयार करुन यथायोग्य शिफारसीसह नियुक्ती प्राधिका-यांकडे सोपविण्यात येईल.

**(क)** शिपाई पदाकरिता पात्र उमेदवारांची ४ थी ची परिक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्रातील एकुण गुणास ७५% मध्ये परावर्तीत करुन त्या आधारे गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल. इयत्ता १० वी च्या परिक्षेपेक्षा अधिक शैक्षणिक अर्हता विचारात घेतली जाणार नाही. गुणवत्तायादीतील उमेदवाराना उपलब्ध पदाच्या संख्येच्या तुलनेत विहीत केलेल्या मर्यादेत प्रत्यक्ष मुलाखतीसाठी बोलावण्यात येईल. मुलाखतीसाठी २५ गुण राखुन ठेवण्यात आलेले आहेत. उमेदवाराने मुलाखतीसाठी उपस्थित राहणे अनिर्वाय आहे. मोठया प्रमाणात अर्ज प्राप्त झाल्यास गुणवत्ता,वय,इत्यादी बाबी विचारात घेवून मोजक्याच उमेदवारांना मुलाखतीसाठी पाचारण करण्यात येईल, व त्या आधारे संयुक्त गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल. संयुक्त गुणवत्ता यादीच्या आधारे निवडसुची तयार करुन यथायोग्य शिफारशीसह नियुक्ती प्राध्याका-यांकडे सोपविण्यात येईल.

२०. प्रथम शासन सेवेत नियुक्त होणा-या उमेदवारांना महाराष्ट्र शासन वित्त विभाग यांचे निर्णय क्र.सीपीएस-१००७/१८/एसईआर-४, दि.०७.०७.२००७ नुसार परिभाषिक अंशदान निवृत्ती वेतन लागु राहिल.

२१. निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्ती नंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात व अर्जासोबत दिलेली माहिती अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवुन ठेवल्याचे निदर्शनास आल्यास तशा उमेदवाराची उमेदवारी किंवा नियुक्ती कोणत्याही क्षणी रद्द करण्यात येईल.
२२. उमेदवारांनी यापुर्वी जरी त्यांचे नाव रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे सेवायोजन कार्यालय/एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालय/जिल्हा सैनिक कार्यालय/पुनर्वसन कार्यालय येथे नोंदविले असले तरी पदाचे भरतीसाठी स्वतंत्रपणे अर्ज करणे आवश्यक आहे.
२३. अपंग आरक्षण शासन निर्णय दिनांक १९.०३.२०१० नुसार अपंगाची निवड झाल्यानंतर ते ज्या सामाजिक प्रवर्गातील असतील त्यांना त्याच प्रवर्गात समांतर आरक्षण म्हणुन सामावुन घेण्यात येईल. किमान ४० टक्के अपंगत्व असणे आवश्यक आहे. अपंगत्वाचे प्रमाणपत्र हे शासकिय वैद्यकिय मंडळाचे असणे आवश्यक आहे.
२४. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग यांचे परिपत्रक क्र.एसआरव्ही-१०९७/प्र.क्र.३१/९८/१६अ, दि.१६ मार्च १९९९ नुसार समांतर आरक्षणाची पदे एकुण अनुशेषाचे पदामधुन गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल.
२५. या जाहिरातीतील नमुद केलेल्या पदावर उमेदवारांची निवड न्यायालयीन निर्णय, शासनाचे विविध विभागाचे शासन निर्णय व परिपत्रके यातील निर्देशाचे अधीन राहिल.
२६. निवड झालेल्या उमेदवारांची नियुक्ती महाराष्ट्रात कोठेही होऊ शकेल.
२७. सदर पदासाठी भरावयाचे अर्जाचे नमुने उपसंचालक,नगर रचना,अमरावती विभाग,अमरावती यांचे कार्यालयाच्या तसेच सहायक संचालक,नगर रचना,अमरावती/अकोला/यवतमाळ/वाशिम व नगर रचनाकार,बुलढाणा या कार्यालयाचे सुचना फलकावर उपलब्ध असतील. सदरच्या निवड प्रक्रीया संबंधिचे लेखी परिक्षा मुलाखत निवडसुची इत्यादीचे वेळापत्रक या कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर यथायोग्यवेळी प्रसिध्द करण्यात येईल. कार्यक्रमामध्ये बदल अथवा रद्द करण्याचे अधिकार निवड समितीने राखून ठेंवलेले आहेत.
२८. सदर जाहिरात खालील संकेतस्थळावर प्रसिध्द केली आहे.(i) www.amravati.nic.in (ii) http://ese.mah.nic.in
**अर्ज स्विकारण्याचे स्थळ :-** उपसंचालक,नगर रचना,अमरावती विभाग,अमरावती,अग्रवाल बिल्डींग " निलगीरी"डॉ जामठे यांचे दवाखान्या जवळ कॉग्रेसनगर रोड,रुखमणी नगर,अमरावती ४४४६०६ दुरध्वनी क्र.(०७२१) २५७०२२६
Email : ddtpdn_amravati@rediffmail.com.

जाक्र.आस्था/ससेभ/रिक्तपदे/उपसंअम/२६११
अमरावती दिनांक २६/१२/२०११

**(गो.दे.चव्हाण)**
अध्यक्ष
विभागीय निवड समिती तथा
उपसंचालक,नगर रचना,
अमरावती विभाग,अमरावती

appointment/३०/१२/२०११

| येथे स्वत:चा<br>अलीकडील<br>फोटो स्वत:चे<br>स्वाक्षरीसह<br>डकवावा |
|---|

**-अर्जाचा नमुना -**

**कनिष्ट लिपीक/अनुरेखक/शिपाई या पदासाठी ----------या प्रवर्गातुन अर्ज**

उपसंचालक,नगर रचना,अमरावती विभाग,अमरावती "निलगीरी बिल्डींग "
डॉ.जामठे हॉस्पीटलचे बाजुला कॉग्रेसनगर रोड,रुखमणीनगर,अमरावती -४४४६०६

| | | |
|---|---|---|
| १. | उमेदवाराचे संपूर्ण नांव | आडनाव स्वत:चे नाव वडिलाचे/पतीचे नांव |
| २. | उमेदवाराचा कायमचा पत्ता | |
| ३. | पत्रव्यवहाराचा सध्याचा संपूर्ण पत्ता (पिनकोड) (दुरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक/ई-मेलसह) | |
| ४. | जन्मदिनांक (वैद्य प्रमाणपत्रा प्रमाणे) | |
| ५. | दिनांक ३१/१२/२०११ रोजीचे वय | ------------वर्ष---------महिना----------वर्ष |
| ६. | जात व जातीचा प्रवर्ग | |
| ७. | ज्या आरक्षणाअंतर्गत नियुक्ती पाहीजे आहे तो प्रवर्ग (सामाजीक तसेच समांतर आरक्षण स्पष्ट नमूद करावे)सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्र/दाखला जोडावा. | |
| ८. | उमेदवार अपंग असल्यास | होय/नाही |
| ९. | असल्यास अपंगत्वाचे प्रमाण (टक्केवारी) | ------------------% |
| १०. | लिंग | स्त्रि/पुरुष |
| ११. | विवाहीत/अविवाहीत | (विवाहीत असल्यास लहान कुटूंब असल्याचे नमुना अ मधील प्रमाणपत्र आवश्यक आहे.) विवाहीत/अविवाहीत |
| १२. | महाराष्ट्र राज्याचा रहिवासी आहे काय ? | होय/नाही |
| १३. | उमेदवार उन्नत प्रगत (क्रिमीलिअर ) गटात मोडत आहे काय ? | होय/नाही |

१४) उमेदवारांची किमान शैक्षणिक अर्हता(उत्तीर्ण परिक्षेचा तपशिल)कनिष्ट लिपीक/अनुरेखक/शिपाई पदासाठी

| शैक्षणिक पात्रता | शाळेचे नांव/परिक्षा मंडळाचे /विघापिठाचे नांव | उत्तीर्ण होण्याचे वर्ष | एकूण गुण | प्राप्त गुण | टक्केवारी | श्रेणी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |

| | | |
|---|---|---|
| १५ | अनुभव (सहा मन्यिापेक्षा जास्त अनुभव असल्यास प्रमाणपत्र जोडावे) | आहे/नाही. |
| १६. | सेवायोजन कार्यालयात नोंदणी आहे काय ?केली असल्यास सेवायोजन कार्यालयाचे नांव नोदणी क्र | होय / नाही<br>सेवायोजन कार्यालयाचे नांव------------------- नोंदणी क्र.------------ |
| १७. | अ) उमेदवार माजी सैनिक आहे काय ? | होय / नाही |

| | | |
|---|---|---|
| | | |
| १८. | मध्यवर्ती/राज्य शासकीय/निमशासकीय सेवेतील कर्मचा-यानी त्यांचे नियुक्ती अधिकारी यांचेमार्फत अर्ज सादर केले आहेत काय ? | होय / नाही/लागु नाही |

१९ अर्जासोबत खालील प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती जोडल्या आहेत काय ?

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | ४थी पास/एस.एस.सी.बोर्डाचे प्रमाणपत्र | | | |
| २. | अर्हता परीक्षा उत्तीर्ण केल्याचे प्रमाणपत्र | | | |
| ३. | जात /जमाती चे प्रमाणपत्र (वैधता प्रमाणपत्र नियुक्तीनंतर तीन महिन्यात सादर करणे बंधनकारक राहील) | | | |
| ४. | महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याचा दाखला (Domicile Certificate) | | | |
| ५. | अनुभव प्रमाणपत्र | | | |
| ६. | सेवायोजन कार्यालयाचे पंजीयन कार्ड | | | |
| ७. | विवाहित /विवाहिता असल्यास लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापण (नमुना अ नुसार) | | | |
| ८. | माजी सैनिक जिल्हा सैनिक कल्याण बोर्डात नांव नोंदणी केल्याचें प्रमाणपत्र | | | |
| ९. | प्रकल्पग्रस्त /भूकंपग्रस्त/अपंग/ पदविका, पदविकाधारक अंशकालीन/खेळाडूबाबतचे प्रमाणपत्र | | | |

**प्रमाणपत्र**

मी प्रतिज्ञापूर्वकअसे जाहीर करतो/करते की, वरील माहिती बरोबर आहे, यापैकी कोणतीही माहिती खोटी आढळल्यास माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर माझी उमेदवारी रदद केल्यास माझी काही तक्रार राहणार नाही.नियुक्तीनंतर वित्त विभाग शासन निर्णय क्र.अनियो १००५/१२६/सेवा-४/दि.३१.१०.२००५ च्या परिभाषित अंशदान योजनेच्या तरतुदी मला मान्य राहतील, तसेच महाराष्ट्र शासन राजपत्र एप्रिल २८, २००५ (वैशाख ८,शके १९२७)मध्ये नमूद केलेल्या विहित नमुन्यातील प्रमाणपत्र सोबत जोडले आहे.

ठिकाण

दिनांक

अर्जदाराची नांव व सही

**<u>प्रतिज्ञापत्र (परिशिष्ट-एक)</u>**

नमुना- अ

(नियम ४ पहा)

मी, श्री/श्रीमती/कुमारी-------------------------------------------------------------

श्री------------------------------------------------------ यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी

वय---------- वर्षे, राहणार ------------------------------------------------------------

याव्दारे पुढील प्रमाणे असे जाहिर करतो/करते की,

१) मी -----------------------------------------------या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

२) आज रोजी मला ---------------------------------- (संख्या) इतकी हयात मुले आहेत.

त्यापैकी दिनांक २८ मार्च २००५ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची

संख्या ----------------------------- आहे (असल्यास, जन्मदिनांक नमुद करावा.)

३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८/३/२००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या, मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण :-------------------------

दिनांक :-------------------------

(अर्जदाराची सही)

**<u>(परिशिष्ट-दोन)</u>**

--------------------------------------------- या पदाचे परिक्षेकरिता उमेदवार ओळखपत्र

**(उमेदवाराने भरावयाची माहिती)**

उमेदवाराचे संपुर्ण नांव :- -----------------------------------

उमेदवाराचा संपुर्ण पत्ता :- -----------------------------------

-----------------------------------

------------------------------------

आरक्षणाचा प्रकार :- ------------------------------------

उमेदवाराचे नांव व सही

---

**(कार्यालयाने भरावयाची माहिती )**

अर्जाचा नोंदणी क्रमांक :- --------------------------------------------

परीक्षा दिनांक :- --------------------------------------------

परिक्षा स्थळ/केंद्र :- --------------------------------------------

बैठक क्रमांक :- --------------------------------------------

प्राधिकृत अधिका-याची सही

appointment/३०/१२/२०११